# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २०/०२/२०१९**

**सभा सुचना क्रं. २१**

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.०१/०२/२०१९ व दि.११/०२/२०१९ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि.०१/०२/२०१९ व दि. ११/०२/२०१९ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | प्रभाग क्र. ५१ मधील गास मोठी सरगोडी येथील जेयम तुस्कानो हाऊस ते ॲडव्होकेट नेपोलियन तुस्कानो पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी मुदतवाढ मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करून सदर काम पुर्ण करणेसाठी मे.नेवाळकर एंटरप्रायजेस यांना सदर कामी मुदतवाढ देणेकामी ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिकमध्ये ववक्षित कामकाजासाठी नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यास पुनश्चः मुदतवाढ देणेबाबत. | ठराव :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ०२ दि. ०३/०४/२०१७ नुसार कार्यालयीन आदेश क्र. वविशम/आस्था/११३२/१७-१८ दि. १९/०१/२०१८ अन्वये श्री. विश्वनाथ काशीनाथ पिंपळे, हे सेवानिवृत्त, गट विकास अधिकारी असून त्यांना घरकुल योजनेच्या कामाचा अनुभव असल्याने त्यांना पंतप्रधान आवास योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी मासिक परिश्रमीक रक्कम म्हणून निवृत्ती वेतनाची रक्कम +महागाई भत्ता मिळून होणारी रक्कम रु. २९७७०/- अक्षरी (एकोणतीस हजार सातशे सत्तर मात्र) या वेतनावर शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ नुसार महानगरपालिकेमध्ये नियुक्त करण्यांत आली आहे. श्री. पिंपळे यांची मुदत दि. २०/१२/२०१८ रोजी संपलेली आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या अंमलबजावणी करीता व कामाची निकड पाहता श्री. पिंपळे यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून त्यांना दि. २२/१२/२०१८ पासून दि. १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमीक तत्वावर मुदतवाढ देणेस व त्यांचे मासिक परिश्रमीकपोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ४. | सन २०१९-२०, सन २०२०-२१, व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षिक वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लांगाराची नियुक्ती करणे. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा विषय/ठराव क्र. १२ दि. १५/११/२०१८ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करून सकारात्मकदृष्ट्या पाहता मे. समीर रा.देसाई यांची निविदा दर सन २०१९-२० करीता ३.२०% सन २०२०-२१ करीता ३.५०% व सन २०२१/२२ करीता ३.८५% सर्वात कमी व वाजवी आहेत. तसेच सदर मंजूर दराने निविदेमध्ये सहभाग घेतलेले अन्य निविदाधारक मे.आर्कव्ह्यू इंजिनिअर्स, मे. एन्गार्ज (आर्किटेक ॲण्ड इंजिनिअर्स) मे. के.के. टेक्नोट्रेड व मे. जयप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (तांत्रिक सल्लागार)काम करणेस इच्छुक असल्यास त्यांनाही पॅनलवर नियुक्त करणेकरीता दि. २१/०१/०१/१९ रोजी पत्र देण्यात आले होते. सदर पत्रास अनुसरुन मे. आर्कव्ह्यू इंजिनिअर्स यांनी आपल्या दि. २४/०१/१९ रोजीच्या पत्राद्वारे, मे. मे. के.के. टेक्नोट्रेड यांनी आपल्या दि. २४/०१/१९ रोजीच्या पत्राद्वारे, मे. जयप्रयाग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी आपल्या दि.२३/०१/१९ रोजीच्या लेखी पत्राद्वारे सदर निम्मत्तम दराने काम करणेची तयारी दर्शविली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा. आयुक्त यांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अफिफ शेख सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या पुर परिस्थीतीवर कायमस्वरुपी उपाययोजना करणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. वरील कामी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू. ७१,८०,०००/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत असून सदरचे काम सन २०१८-१९ च्या नालेसफाईच्या मंजूर निविदाधारक मे साई गणेश एंटरप्रायजेस ह्यांच्याकडून मंजूर दराने करून घेणेत यावे. तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्मशानभूमीसाठी खरेदी केलेल्या जळाऊ लाकडांचे देयक अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरील विषयाबाबत चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र यांनी जळाऊ लाकडे उपलब्ध होणार नसल्याचे कळविल्याने प्रशासनाने अत्यावश्यक सेवेच्या अनुषंगाने तातडीने कोटेशन पध्दतीने दरपत्रके मागवून मे. आकाश एंटरप्रायजेस लघुत्तम मंजूर दरपत्रकधारक यांचेकडून महानगरपालिकेची होणारी संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी दि. ११/०२/२०१९ पर्यंत जळाऊ लाकडांची पुरवठा करून घेतला असून प्रशासनाने केलेल्या या निहीत कार्यवाहीस व सदर कामी येणाऱ्या रू. ५९,४५,३२३/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची - ड प्रकरण-५ संविदा २ (२) नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजूरी ही सभा देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | प्रभाग समिती अे कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ४,१३,३३ मधील विरार (प.) नारिंगी तलाव, डोंगरपाडा तलाव, रानपाडा तलावातील पाणी उपसणे, गाळ काढणे, खोदकाम करणे, | ठराव :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रू.७१,१८,६३९/-) या खर्चास ही सभा प्रशाकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | वाहतुक करणे वैगरे कामास प्रशासकीय वित्तीय मंजूरी देणेबाबत. | |
| ८. | प्रभाग समिती डी अंतर्गत नालासोपारा पूर्व येथील वॉर्ड क्र. ८० मधील तुलीप सोसायटी ते विद्या विकासिनी शाळेपर्यंत रस्ता खडीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या निविदाधारकासोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती यांनी यापुर्वीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे.आदित्य एंटरप्रायझेस यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.००% कमी दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. महेश पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ९. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ५९ हद्दीतील गोखीवरे, संतोष भुवन येथील श्री.दिपक चौधरी यांचे घराजवळील तलाव (तलाव क्र.२) सुशोभिकरण करणे व विकसीत करणे या कामी प्राप्त निवदांपैकी लघुत्तम दराचा निविदा धारकासोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.साई गणेश एंटरप्रायझेस यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयेुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र. ५९ (जुना) गोखिवरे संतोष भुवन येथील नंदु किणी यांचे घराजवळील तलाव सुशोभिकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.एच.व्ही. कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.८२ मधील | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. १४३ दि.२८/०४/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. जिवदानी एंटरप्रायझेस यांची अंदाजपत्रकापेक्षा (-) १०.२७% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| | फेस्टीवल कॉम्प्लेक्स ते जया पॅलेस मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधकाम करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिकेतील ई गर्व्हनन्स -प्रकल्पाअंतर्गत विविध विभागांचे कामकाज संगणक प्रणालीद्वारे, स्व:तचे स्टेशनरी सर्वर व आज्ञावली, संगणक यंत्रणा, (Software) वापरुन ऑनलाईन स्वरुपात ठेका पध्दतीने चालविणेकरीता एजन्सी नियुक्त करणेकामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त लघुत्तम दर मंजुर करुन लघुत्तम निविदाधारकाबरोबर वित्तीय वर्ष २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ करीता संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे. असेंटेक इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी प्रा.लि. यांचे सोबत वित्तीय वर्ष २०१८-१९, २०१९-२० व २०१०-२१ करीता वाटाघाटी अंती दर मंजूर करुन संविदा करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफिफ शेख सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | प्रभाग समिती एफ धानिव /पेल्हार क्षेत्रातील जाधवपाडा येथील वालीव येथे मुख्य रस्ता ते बालाजी हार्डवेअर शॉप पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. गजानन कन्स्ट्रक्शन यांची निविदा ४.२९% जास्त दराच्या ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | वसई विरार शहर महानगरपालिका उसगाव/शिरवली २० द.ल.ली क्षमता योजनेच्या पारोळ जलशुध्दीकरण केंद्रामधील | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमूद कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यास व सदरचे काम अत्यंत तातडीचे असल्याने कमी कालावधी करीता ई-निविदा मागविण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अफिफ शेख सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | फिल्टर बेडची वाळ, Valve, Sluice gate बदलणे तसेच Wash Water Pump, Air Blower बदलणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | |
| १५. | प्रभाग समिती- सी, वॉर्ड क्र.१८ मधील टोटाळे तलावातील पाणी उपसणे, गाळ काढणे, खोदकाम करणे, वाहतूक करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या निविदा धारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २३७ दि.२६/०९/२०१८ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. महावीर एंटरप्रायजेस यांची अंदाजपत्रकीयपेक्षा ५.००% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. तरी मा. आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा. स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री. मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १६. | विरार (पू.) प्रभाग क्र.१५ (नविन प्रभाग क.८) मध्ये अण्णापाडा येथे ६ सीटचे शौचालय बांधणे. (फेर निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ५ दि.२३/१२/२०१४ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. गिरीशचंद्र हरिगेन अहिर यांची अंदाजपत्रकापेक्षा (-) ४.८०% कमी दराने निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अफिफ शेख सूचक :- मा.श्रीम.दिक्षा घरत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | प्रभाग समिती सी वॉर्ड क्र.२४ मध्ये विरार (पू) येथील फुलपाडा स्मशानभूमीचा विकास करणे (टप्पा -२) कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ३१९ दि.०२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. स्पेक्ट्राम कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. तरी मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. किशोर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १८. | विरार पू. प्रभाग क्र. २१ मध्ये फुलपाडा मुख्य रस्ता ते भालचंद्रनगर रस्त्यापर्यंत रस्त्याचे | ठराव :- सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. २११ दि.०२/०५/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. ए.जी. पाटील ह्यांची ०.००%जास्त (अंदाजपत्रकीय दराची) निविदा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | <u>खडीकरण व डांबरीकरण करणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.</u> | लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस देणेकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. तरी मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका